।। सा विद्या या विमुक्तये ।।
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994-Recognized by the UGC U/s 2(f) and 12(b), NAAC Re-accredited with 'B++' Grade

## CONVOCATION SECTION
Phone : (02462) 215294 website:srtmun.ac.in e-mail.:directorboee@gmail.com

जा क्र./दीक्षांत/२०२३—२४/४७६९ दिनांक : २८/०८/२०२३

**:: २६ वा दीक्षान्त समारंभ सूचना ::**

प्रति,
१. मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये,
२. मा.संचालक, सर्व संकुले, विद्यापीठ परीसर, नांदेड,
३. मा.संचालक उपकेंद्र लातूर, उपपरिसर परभणी,
४. मा.प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली,
५. समन्वयक,कै.उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : २६ व्या दीक्षांत समारंभाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांच्या माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव सूचना बाबत.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा सविसावा दीक्षान्त समारंभ सोमवार दिनांक २५ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता विद्यापीठ प्रांगणात घेण्याचे ठरले आहे. समारंभाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे **कुलपती मा.श्री. रमेश बैस** हे भूषविणार असून, प्रमुख पाहुणे म्हणुन **मा.ना.चंद्रकांत पाटील**, **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** महाराष्ट्र राज्य हे उपस्थित राहणार आहेत. विद्यापीठाचे **मा.कुलगुरु डॉ. उध्दव भोसले** व **मा.प्र—कुलगुरु डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन** यांच्या उपस्थितीत हा समारंभ संपन्न होणार आहे.

सदरील दीक्षान्त संमारभामध्ये **सुवर्ण पदक प्राप्त विद्यार्थी व पीएच.डी.पदवी प्राप्त विद्यार्थ्यांनाच पदवी प्रमाणपत्र प्रमुख उपस्थितांच्या हस्ते वितरीत करण्यात येणार आहेत. त्यामुळे सुवर्ण पदक प्राप्त विद्यार्थ्यांनी दिनांक २३ सप्टेंबर २०२३ च्या अगोदर प्रस्तुत विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील समन्वय कक्ष, तळ मजला येथे नांव नोंदणी करणे अनिवार्य आहे. ज्यांची नोंद २३/०९/२०२३ पर्यंत झालेली आहे, त्याच विद्यार्थ्यांना कार्यक्रमाच्या दिवशी सुवर्ण पदक वितरीत करण्यात येईल. पीएच.डी.पदवी प्राप्त विद्यार्थ्यांनी सकाळी ८.०० ते १०.००** दरम्यान त्यांच्या उपस्थितीची नोंद पदव्युत्तर विभाग (P.G. Section) प्रस्तुत विद्यापीठ येथे करणे अनिवार्य आहे.

सदरील दीक्षान्त संमारंभामध्ये **सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थ्यांना तसेच पीएच.डी.पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना दुपारच्या सत्रात ठिक २.०० वाजता दीक्षान्त मंचावर पदवी प्रमाणपत्र वितरीत केले जाणार आहेत, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

तसेच प्रस्तुत विद्यापीठातील सर्व संकुलातील विद्यार्थ्यांनी, विद्यापीठ उपकेंद्र लातूर संकुलातील विद्यार्थ्यांनी व न्यू मॉडल डीग्री कॉलेज हिंगोली येथील ज्या विद्यार्थ्यांनी २६ व्या दीक्षान्त समारंभासाठी उपस्थित राहुन पदवी/पदविका घेण्यासाठी अर्ज सादर केले आहेत, आशाच विद्यार्थ्यांना प्रस्तुत विद्यापीठातील दीक्षान्त कक्ष विभागातून सकाळी ८.०० ते १०.०० दरम्यान पदवी प्रमाणपत्र वितरीत केले जातील.

यावेळी विद्यार्थ्यांना विद्याशाखानिहाय ठरविण्यात आलेले उपरणे लेखा विभागामधून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी अनामत रक्कम रु. १५०/— लेखा विभागामध्ये जमा करणे आवश्यक आहे. त्यांनतरच संबधितांना दीक्षान्त समारंभाच्या वेळेपूरते परीधान करण्यासाठी उपरणे दिले जातील. दीक्षान्त समारंभ संपल्यानंतर उपरण्यासाठी जमा केलेली अनामत रक्कम रु.१५०/— पैकी उपरणे शुल्कापोटी रु.१०/— वजा करुन उर्वरीत शुल्क रक्कम रु.१४०/— परत करण्यात येईल. यासाठी **पदवी प्राप्त विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रासाठी भरलेल्या शुल्काची मुळ पावती व स्वत: चे ओळखपत्र (I. D. Proof) सोबत असणे/ ठेवणे अनिवार्य आहे.**

दीक्षात समारंभामध्ये उपस्थित राहून पदवी/पदवीका गृहण करणा—यां विद्यार्थ्यांनी पांढरा पायजमा/पॅन्ट व पांढरा बुशर्ट (कॉलरसहित) तसेच, विद्यार्थीनींनी पांढरी साडी व पांढरा ब्लाउज किंवा पांढ—या रंगाच्या ओढणीसह पांढरा पंजाबी ड्रेस परीधान केलेला असावा.

**प्रस्तुत विद्यापीठाशी सर्व संलग्नीत महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा विभागाच्या दिनांक २६.०६.२०२३ रोजीच्या परीपत्रकानुसार आपआपल्या महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलले आहेत, अशा विद्यार्थ्यांचे पदवी प्रमाणपत्र दिनांक २५ सप्टेंबर २०२३ च्या विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ संपन्न झाल्यानंतर, एक महिन्याचे आत महाविद्यालयस्तरावर पदवी वितरण कार्यक्रम आयोजीत करुन पदवी प्रमाणपत्र वितरीत करण्यात यावेत.**

**याबाबत सर्व संलग्नीत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, तसेच सर्व प्राचार्यांनी त्यांच्या महाविद्यालयात घेण्यात येणा—या पदवी प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाची सूचना सर्व विद्यार्थ्यांना अवगत करुन द्यावी.**

**सदरील परीपत्रकाची नोंद घेवून उपरोक्त बाब सर्व विद्यार्थी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्या निदर्शनास आणुन दयावी.**

वरीलप्रमाणे २६ वा दीक्षान्त समारंभ हा आपल्या विद्यापीठाचा महत्वपुर्ण सोहळा असल्यामूळे त्यासाठी सर्व संलग्नीत महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती प्रार्थनीय आहे.

(डॉ. दिगंबर एम. नेटके)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहिती व कार्यवाहीस्तव :
०१ मा.कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ,
०२ मा.प्र—कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ,
०३ मा.कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ,
०३. सर्व विभाग प्रमुख, प्रशासकीय विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.